**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.५०)**

**गुरुवार दिनांक ९ जुलै २०२६**

**ठळक बातम्या....**

1. **तिसऱ्या ब्रिक्स परिवहन मंत्र्यांच्या बैठकी अंतर्गत आज नागपुरात परिवहन कार्यगटाचे सत्र आयोजित**

2. **ऑस्ट्रेलिया आणि भारताच्या संरक्षण सहकार्याविषयीचं संयुक्त निवेदन जारी**

3. **राज्यात समान नागरी कायदा तयार करण्यासाठी ७ जणांची समिती स्थापन केल्याची मुख्यमंत्र्याची विधानसभेत घोषणा**

**आणि**

4. **भारताचा १८ वर्षीय टेनिसपटू अर्णव पापरकर याने विम्बल्डन कनिष्ठ गटातल्या पुरुष एकेरी च्या उपांत्य फेरीत प्रवेश करून घडवला इतिहास**

**आता सविस्तर बातम्या ......**

**ब्रिक्स**

तिसऱ्या ब्रिक्स परिवहन मंत्र्यांच्या बैठकीअंतर्गत आज नागपुरात परिवहन कार्यगटाच्या सत्राचे उद्‌घाटन झाले. सत्रानंतर केंद्रीय परिवहन सचिव व्ही. उमाशंकर यांनी सांगितले की, ब्रिक्स सदस्य देशांच्या परिवहन मंत्रालयांच्या अधिकाऱ्यांसोबत सर्क्युलर इकॉनॉमी, शाश्वत गतिशीलता (मोबिलिटी) तसेच परिवहन क्षेत्रातील विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली. यावेळी सदस्य देशांनी परिवहन क्षेत्रातील सर्वोत्तम पद्धती (Best Practices) आणि परस्पर सहकार्याच्या संधींवरही विचारविनिमय केला.

***(होल्ड बाईट - ३८ सेकंद )***

दरम्यान, 11 जुलै रोजी होणाऱ्या ब्रिक्स परिवहन मंत्र्यांच्या बैठकीचे अध्यक्षस्थान केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी भूषवणार असून ही बैठक 12 जुलैपर्यंत नागपुरात सुरू राहणार आहे.

**मोदी ऑस्ट्रेलिया दौरा**

भारत आणि ऑस्ट्रेलियाची द्विपक्षीय भागीदारी भविष्यासाठीचं एक भक्कम नातं असून आर्थिक आणि व्यापारविषयक सहकार्याला मिळालेली गती हे या चर्चेचं यश असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बनीज यांनी दोन्ही देशांमधल्या संरक्षण सहकार्याबाबतचं संयुक्त निवेदन जारी केलं, त्यावेळी ते बोलत होते. ऑस्ट्रेलियात मेलबर्न इथे दोन्ही नेत्यांची आज बैठक झाली त्यानंतर हे निवेदन देण्यात आलं. भारत आणि ऑस्ट्रेलिया या देशांमधल्या सामायिक घटकांवर प्रधानमंत्री म्हणाले...-

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी- -३० सेकंद)***

दोन्ही देशांमध्ये २०२२ साली झालेला आर्थिक आणि व्यापारी सहकार्य करार विक्रमी वेळेत लागू झाल्यानंतर भारतातून ऑस्ट्रेलियाला होणारी निर्यात दुप्पट झाल्याचं यावेळी मोदी यांनी सांगितलं. हिंद प्रशांत क्षेत्रात शांतता, स्थैर्य आणि प्रगती साध्य करण्यासाठी दोन्ही देशांमध्ये सहकार्य आवश्यक आहे असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे.

**विधी मंडळ**

राज्यात समान नागरी कायदा तयार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली ७ जणांची समिती स्थापन केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. या समितीने ६ महिन्यांत अहवाल द्यावा आणि नागपूर इथं होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात समान नागरी कायदा आणायचा प्रयत्न करू, असंही त्यांनी सांगितलं. या समितीत मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण, न्यायमूर्ती एस. जी. मेहरे, राज्याचे माजीमुख्य सचिव डी. के. जैन, मुख्य महाधिवक्ता वीरेंद्र सराफ, पद्मश्री आणि राज्यघटनेचे अभ्यासक रमेश पतंगे, शिक्षणतज्ञ आणि सामाजिक

कार्यकर्त्या सुवर्णा रावल यांचाही या समितीत समावेश आहे. छत्रपती शिवाजीमहाराज यांनी किल्ले प्रतापगडाच्या पायथ्याशी अफझलखान भेटीच्या वेळी त्याचा अंगरक्षकसय्यद बंडा याचा वार रोखून छत्रपतींचं रक्षण करणारे वीर जिवाजी महाले यांचं स्मारक उभारण्यासाठी पहिल्या टप्प्यात १ कोटी रुपये मंजूर केल्याची घोषणा मंत्री शंभुराज देसाई यांनी केली.मुंबई उपनगरातील खारफुटी क्षेत्रात 1 जानेवारी 2011 पर्यंत वास्तव्यास असलेल्या पात्र रहिवाशांचे सर्वेक्षण करून त्यांचे पुनर्वसन करण्यात येईल, असे आश्वासन मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिल.'लोकराज्य' मासिकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो उलटा छापल्याच्या प्रकरणाची चौकशी करून 24 तासांत कारवाई केली जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. या मुद्द्यावर विरोधकांनी सभागृहात घोषणाबाजी केली.नाशिक कुंभमेळ्यासाठी प्रस्तावित रिंगरोडच्या आखणीत अनियमितता झाली का, याची उच्चस्तरीय चौकशी करून 15 दिवसांत अहवाल सादर केला जाईल, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.विधान परिषदेत मंत्री जयकुमार रावल यांनी कांद्यावर प्रक्रिया उद्योगाला चालना देण्याचा अभ्यास सुरू असल्याची माहिती दिली. तर 48 साखर कारखान्यांकडे ऊस उत्पादकांचे 298 कोटी रुपये थकीत असून, ही रक्कम व्याजासह मिळवून देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितलं.

**पुनर्वसन**

राज्यातील सरकारी, वन तसेच केंद्र  आणि राज्य सरकारच्या विविध प्राधिकरणांच्या जमिनींवर 1 जानेवारी 2011 पूर्वी उभारलेल्या पात्र घरांना संरक्षण देऊन त्यांचे एसआरए, म्हाडा किंवा अन्य गृहनिर्माण योजनांतून पुनर्वसन करण्यात येणार असल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली. यासाठी तीन महिन्यांत सर्वेक्षण पूर्ण करून पुनर्वसनाचा मास्टर प्लॅन तयार केला जाणार असून, 2011 पूर्वीच्या एकाही पात्र रहिवाशाला बेघर होऊ दिले जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**महाराजस्व अभियान**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचा विस्तार करत राज्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात 22, 25 किंवा 26 जुलै रोजी एका भव्य शासकीय महाशिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली. या शिबिरांत सेवा हमी कायद्यांतर्गत विविध शासकीय सेवा, महिला शेतकरी ओळखपत्रे आणि गावठाणांच्या स्वामित्व सनदांचे वाटप केले जाणार असून राज्यातील किमान 10 लाख कुटुंबांना योजनांचा लाभ देण्याचा शासनाचा संकल्प आहे.

**धरती आबा**

धरती आबा भगवान बिरसा मुंडा योजना ही आदिवासी बांधवांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी राबविण्यात येत असून, या योजनेअंतर्गत विहिरींच्या कामात गैरव्यवहार झाल्याचे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर आणि कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करून निलंबनाची कारवाई करण्यात येईल, अशी माहिती कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी विधानसभेत दिली.

**टीईटी पेपरफुटी**

महाराष्ट्र टीईटी पेपरफुटी प्रकरणात ठाणे पोलिसांनी उत्तर प्रदेशातून हरी ओम आणि पवन यादव या आणखी दोन आरोपींना अटक केली आहे. तपासात दोघांचा पेपरफुटीतील आर्थिक व्यवहारांशी थेट संबंध आणि कटात सक्रिय सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. दोघांना न्यायालयात हजर करण्यात येणार असून, या प्रकरणातील इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

**क्रीडा संकुल**

रामदासपेठ येथील नागपूर महानगरपालिकेच्या मोर हिंदी उच्च प्राथमिक शाळेच्या जागेवर अत्याधुनिक क्रीडा संकुल उभारण्याचे काम वेगाने सुरू असून, या प्रकल्पाची मनपाच्या क्रीडा विशेष समिती सभापती श्रीमती दर्शनी धवड यांनी पाहणी केली.

**आंदोलन**

यवतमाळ जिल्हयातील  वणी इथल्या वेकोलीच्या मुंगोली आणि पैनगंगा कोळसा खाणींतील कोळसा वाहतूक भाजपच्या आंदोलनामुळे आज सकाळी 11 वाजल्यापासून ठप्प झाली. भाजप नेते विजय पिदुरकर आणि माजी आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार यांच्या नेतृत्वाखाली शंभरहून अधिक कोळसा वाहतूक करणारे ट्रक रोखून धरण्यात आले. रस्त्यांची दुरवस्था, स्थानिक बेरोजगारांना रोजगार, रेल्वे अंडरपासमधील पाणी आणि चिखलाची विल्हेवाट तसेच पायाभूत सुविधांच्या मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले.

**भजन  आंदोलन**

अयोध्येतील राम मंदिरातील कथित भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ काँग्रेसने आज गडचिरोलीतील फुटका देऊळ परिसरातील श्रीराम मंदिरात 'रघुपती राघव राजाराम' भजन गाऊन आंदोलन केले. जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. विश्वजीत कोवासे यांनी मंदिरातील देणगी व दागिन्यांच्या कथित गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली.

**अर्णव पापरकर**

भारताचा १८ वर्षीय टेनिसपटू अर्णव पापरकर याने विम्बल्डन कनिष्ठ गटातल्या पुरुष एकेरी च्या  उपांत्य फेरीत प्रवेश करून इतिहास घडवला आहे. गेल्या ३६ वर्षात पुरुष एकेरी गटात इथवर पोचणारा तो भारताचा पहिला खेळाडू आहे.

**हवामान**

हवामान-  विदर्भात नागपूर सह भंडारा ,गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ जिल्हयात  तुरळक ठिकाणी  मेघगर्जनेसह सोसाट्याचे वारे आणि  वादळाची  तसंच  हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे.

*******